रेडक्रॉस जळगाव शाखेच्या रक्तकेंद्रात रक्त संक्रमण अधिकारी म्हणून पाच पदे भरावयाची आहेत. या पदांसाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी रेडक्रॉस भवन, न्यू. बी.जे. मार्केट जवळ, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

१. **वयोमर्यादा :** रक्त संक्रमण अधिकारी या पदासाठी कमाल वयोमर्यादा ३८ अशी आहे व सुयोग्य प्रकरणी ती ४५ वर्षे पर्यंत शिथिलक्षम असेल. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास कमाल वयोमर्यादा ६२ असेल व सुयोग्य प्रकरणी ती ६५ वर्षे पर्यंत शिथिलक्षम राहील.

२. **शैक्षणिक अर्हता व अनुभव :** मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा एम.बी.बी.एस. पदवी सोबत पॅथॉलॉजी / क्लिनिकल पॅथॉलॉजी / ट्रान्सफ्युजन मेडिसिन मधील डिप्लोमा. तसेच, रक्तकेंद्रात रक्त गट सीरॉलॉजी, रक्त गट पद्धती आणि रक्त संपादन किंवा त्याच्या घटकांच्या तयारीमध्ये किंवा दोन्हीमध्ये गुंतलेल्या वैद्यकीय तत्त्वांचे पुरेसे ज्ञान आणि अनुभव.

३. **प्राधान्य/उच्च अर्हता:** एम.बी.बी.एस. पदवीसह पॅथॉलॉजी, ट्रान्सफ्युजन मेडिसिन, किंवा इम्युनोहेमॅटोलॉजी आणि ब्लड ट्रान्सफ्युजन (IHBT) मध्ये एम.डी. / डी.एन.बी.

४. **नोंदणी:** राज्य वैद्यकीय परिषद किंवा राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे वैध नोंदणी असणे आवश्यक.

रेडक्रॉस जळगाव शाखेच्या रक्तकेंद्रात प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून २ पदे भरावयाची आहेत. या पदांसाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी रेडक्रॉस भवन, न्यू. बी.जे. मार्केट जवळ, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे दिनांक ३० सप्टेबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

१. **वयोमर्यादा :** प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे अशी आहे, सुयोग्य प्रकरणी ती शिथिलक्षम असेल. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास वयोमर्यादा ६० ते ६५ वर्षापर्यंत असू शकते.

२. **शैक्षणिक अर्हता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. पदवीसह एम.एल.टी. / पी.जी.डी.एम.एल.टी. किंवा वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञानामध्ये बी.एस्सी. किंवा बी.पी.एम.टी. पदवी.

३. **अनुभव :** मान्यताप्राप्त रक्तकेंद्रामध्ये रक्त संकलन, चाचण्या आणि साठवणुकीचा किमान १ ते २ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.

४. **प्रोबेशन कालावधी:** परिवीक्षाधीन कालावधी १ वर्षाचा असेल.

रेडक्रॉस जळगाव शाखेच्या रक्तकेंद्रात ए.एन.एम. १पद भरावयाचे आहे. या पदासाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी रेडक्रॉस भवन, न्यू. बी.जे. मार्केट जवळ, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे दिनांक ३० सप्टेबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

१. **वयोमर्यादा** : या सहायक परिचारिका (ए.एन.एम.) पदासाठी वयोमर्यादा नाही.
२. **शैक्षणिक अर्हता:** मान्यताप्राप्त संस्थेचा नर्सिंग डिप्लोमा पूर्ण केलेला असावा तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणीकृत ए.एन.एम. म्हणून नोंदणी आवश्यक.
३. **अनुभव :** किमान २-३ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.
४. **प्रोबेशन कालावधी:** परिवीक्षाधीन कालावधी १ वर्षाचा असेल.

रेडक्रॉस जळगाव शाखेच्या रक्तकेंद्रात जनसंपर्क अधिकाऱ्यांची २ पदे भरावयाची आहेत. या पदांसाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी रेडक्रॉस भवन, न्यू. बी.जे. मार्केट जवळ, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे दिनांक ३० सप्टेबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

१. **वयोमर्यादा :**जनसंपर्क अधिकारी या पदासाठी किमान वयोमर्यादा २६ वर्षे अशी आहे, सुयोग्य प्रकरणी ती शिथिलक्षम असेल.
२. **शैक्षणिक अर्हता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस.डब्ल्यू.
३. **अनुभव :** मान्यताप्राप्त रक्तकेंद्रामध्ये १ ते २ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.
४. **प्रोबेशन कालावधी:** परिवीक्षाधीन कालावधी १ वर्षाचा असेल.
५. **कामाचे स्वरूप:**रक्तदान शिबिराचे वेळापत्रक तयार करून त्यासाठी आयोजकांशी संपर्क साधणे.

- रक्तदान शिबिराची पूर्वतयारी, ठिकाणाची पाहणी निरीक्षण करून अहवाल तयार करणे.
- रक्तकेंद्रात आलेल्या रक्तदात्यांशी सुसंवाद साधणे. त्यांना नियमित रक्तदाते होण्यासाठी/ शिबिर आयोजक होण्यासाठी प्रेरणा देणे.
- रक्तपिशवी/ रक्तघटक रुग्णाच्या नातेवाईकांना देतांना समुपदेशन करणे व रक्त घटकांची गुणवत्ता आपण वापरात असलेल्या किट व रसायने यांची माहिती देऊन उपयुक्तता समजावणे.
- रक्तदात्यांना रक्तदान केल्यानंतर त्याचे होणारे फायदे याची माहिती देणे.
- रेडक्रॉस रक्तकेंद्रातून वितरीत केले जाणारे रक्त घटक अति उच्च दर्जाची चाचणी प्रणालीचा वापर करून गुणवत्तायुक्त रक्त घटक दिले जातात याची माहिती देणे.
- रक्तदात्यांमध्ये विद्यार्थीची संख्या वाढविण्यासाठी क. ब. चौ. उ. म. वि. यांनी दिलेल्या २ अतिरिक्त गुणांची माहिती देणे.
- मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी देणे वकेम्युलीमिनिसंस रक्त चाचणीकेली जातेतसेच,ल्युको रिड्यूस्ड माशिनद्वारेरक्त घटक तयार

केले जातात आणि TRIMA TP SDP Machine अति उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून platelets काढले जातात याची माहिती देणे.

- रक्तदान शिबिराचा feedback अहवाल तयार करणे.

रेडक्रॉस जळगाव शाखेच्या कार्यालयात संवाद अधिकाऱ्याची २ पदे भरावयाची आहेत. या पदांसाठी शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी रेडक्रॉस भवन, न्यू. बी.जे. मार्केट जवळ, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे दिनांक ३० सप्टेबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

१. **वयोमर्यादा :**संवाद अधिकारी या पदासाठी किमान वयोमर्यादा २६ वर्षे अशी आहे. सुयोग्य प्रकरणी ती शिथिलक्षम असेल.

२. **शैक्षणिक अर्हता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास कम्युनिकेशन (जनसंवाद) /जन संपर्क/सामाजिक शास्त्र शाखेतील पदवी किंवा कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी.

३. **अनुभव :** मान्यताप्राप्त संस्थेमध्ये साधारणपणे २ ते ३ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असल्यास प्राधान्य.

४. **प्रोबेशन कालावधी:** परिवीक्षाधीन कालावधी १ वर्षाचा असेल.

   - **महत्वाची कौशल्य आणि क्षमता :** स्थानिक आणि अधिकृत भाषांमध्ये, (मराठी, हिंदी, इंग्रजी) लेखी व तोंडी संवादाचे उत्कृष्ट प्रभुत्व.
   - माध्यम संबध – प्रसिद्धी पत्रके (प्रेस रिलीज) तयार करणे, माध्यम मोहिमांचे व्यवस्थापन करणे आणि जन संपर्काची संकटकालीन परिस्थिती हाताळणे याबाबत क्षमता.